D:APB branch/ Govt.Letter-2014-2020-2021-new

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ


कृषि नगर, वसमत रोड,
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com/reg@vnmkv.ac.in | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


**वाचा:**

१. शासन निर्णय वित्त विभाग,क्रमांक वेपूर-२०१८/प्र.क्र.४४ सेवा-९ दि.०१.०१.२०१९
२. शासन अधिसुचना क्र.वेपूर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९ दिनांक ३०.१.२०१९
३. शासन परिपत्रक क्र. वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९ दिनांक २०.२.२०१९
४. शासन परिपत्रक क्र. वेपूर-२०१९/प्र.क्र.१५/सेवा-९ दिनांक १४.५.२०१९
५. शासन परिपत्रक क्र. वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९ दिनांक ३०.५.२०१९
६. शासन निर्णय क्र.कृषीवि-३७१९/प्र.क्र.४०/६-अे दिनांक १६.२.२०२१

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत शिक्षकेत्तर कर्मचायांना ७ वा वेतन आयोगा प्रमाणे सुधारीत वेतन संरचनेनुसार वेतन अदा करण्याबाबत**

## परिपत्रक

**जा.क्र.२०२१/सा.वे.आ/प्र.क्र.२६/आस्था-८/**805 **दिनांक: २३.२.२०२१** 24

प्रकरणी सर्व कार्यालय प्रमुख / अहरण संवितरण अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, कृषि विद्यापीठामधील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना संदर्भीय क्रमांक ६ वरील शासन निर्णयानुसार सुधारीत वेतन संरचना लागू करण्यात आली आहे. त्यासोबत संदर्भीय शासन निर्णयान्वये नियमीत आस्थापनेवरील पूर्णवेळ कार्यरत अधिकारी / कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतन संरचना दिनांक ०१.०१.२०१६ पासून लागू करण्यात आलेली आहे. त्यानुसार विद्यापीठातील पात्र शिक्षकेत्तर कर्मचारी यांची कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर कर्मचायांचे विकल्प घेऊन जलद गतीने वेतन निश्चिती करून तसे वेतन निश्चितीचे आदेश काढण्यात यावेत.

तसेच विद्यापीठातील पात्र अधिकारी /कर्मचारी यांना फेब्रुवारी-२०२१ देय मार्च २०२१ चे वेतन सुधारीत दराने अदा करून दिनांक ०१.०१.२०१९ ते ३१.०१.२०२१ या कालावधीतील थकबाकी रोखीने अदा करण्यात यावी. आणि १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर-२०१८ पर्यंतच्या देय्य होणाया थकबाकीच्या रक्कमेबाबत संदर्भीय शासन परिपत्रक दिनांक २० फेब्रुवारी-२०१९ नुसार कार्यवाही करुन पहिला हप्ता शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधीताच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावा.

तसेच जे अधिकारी/कर्मचारी हे नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन धारक आहेत त्यांना शासन परिपत्रक क्रमांक वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९ दिनांक ३०/०५/२०१९ नुसार पहीला हप्ता रोखीने अदा करण्यात यावा. उर्वरीत थकबाकी हप्त्या बाबत पुढील आदेश होईपर्यंत कार्यवाही करण्यात येवू नये.

तसेच दिनांक १.१.२०१६ ते दि.१ जानेवारी-२०२१ या दरम्यान सेवा निवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबत देखील वरीलप्रमाणे सेवा निवृत्तीपर्यंतच्या सेवा कालावधीसाठीची कार्यवाही संबंधीत कार्यालयांनी तात्काळ करावी.त्यांचे सेवानिवृत्ती नंतरची (फक्त निवृत्ती वेतनाबाबत) कार्यवाही नियंत्रक कार्यालयाच्या स्तरावरून करण्यात यावी.

मा. कुलगुरु यांचे मान्यतेने,

(रणजीत आ. पाटील)
**कुलसचिव**